# प्रकरण तिसरे

# राजकीय पक्ष पद्धतीचा उगम व विकास

## प्रकरण तिसरे

# राजकीय पक्ष पद्धतीचा उगम व विकास

---

३.१ प्रस्तावना

३.२ व्याख्या

३.३ राजकीय पक्षाचे महत्त्व

३.४ राजकीय पक्षाचा उगम

३.५ राजकीय पक्षाचा विकास

३.६ भारतीय पक्ष पद्धतीचा उगम व विकास

## ३.१ प्रस्तावना :-

प्रत्यक्ष राजकीय प्रक्रियेत राजकीय पक्षाचे स्थान नेहमीच मध्यवर्ती असते, असे दिसून येते. व्यक्ती आणि गट यांना राजकारणाशी जोडणारा दुवा राजकीय पक्षच असतात. व्यक्तींना राजकारणाशी जोडून घेण्यात आणि सत्तेच्या खेळांचे साक्षीदार व भागीदार बनविण्याच्या कामी राजकीय पक्षच महत्त्वाचे ठरतात. त्याचबरोबर सामूहिक जागृती करणे, कृतिप्रणवता घडविणे आणि प्रत्यक्ष सामूहिक कृती साकार करणे हे कामही राजकीय पक्षच पार पाडीत असतात.

"राजकीय पक्ष हे सत्तेच्या गढीवर मुक्कामाला असतात असे मॅक्स वेबर यांनी म्हटले आहे. सत्तेशी असणाऱ्या अतूट नात्यामुळेच राजकीय पक्ष वादाचे विषयही बनतात."[१] राजकीय पक्ष पद्धतीचा उगम हा राजकीय विचारातूनच झाला आहे. हे राजकीय संशोधनातून दिसून येते. तसे बघितले तर राजकीय विचारांचा जन्म प्राचीन काळी ग्रीस या देशांमध्ये प्लेटो व ॲरिस्टॉटल यांच्या तत्त्वज्ञानामध्ये झाला आहे. म्हणजेच राजकीय विचारांची उत्पत्ती, उन्नती ही प्राचीन काळापासून झाली असून कालपरत्वे विविध परिवर्तनातून तिचा प्रवास झाल्याचे आपणास दिसून येते. म्हणजेच राजकीय विचारांच्या माध्यमातून राजकीय व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टिकोनातून राजकारण व राजकीय पक्ष पद्धतीचा उगम झाल्याचे आपणास दिसून येते.

राजकीय पक्षाचे अस्तित्व हे लोकशाही विचारधारेच्या दृष्टिकोनातून फार महत्त्वाचे आहे. जसे समुद्रामध्ये लाटा येणे अनिवार्य आहे तसेच लोकशाही राष्ट्रामध्ये राजकीय पक्षांचे अस्तित्व अनिवार्य आहे. म्हणजेच लोकशाहीत राजकीय पक्षांशिवाय सरकार बनू शकत नाही, कारण की लोकांचे सार्वभौमत्व हे लोकशाही राष्ट्रामध्ये दिसून येते. म्हणून ज्या ज्या राष्ट्राने लोकशाही विचार धारेचा स्वीकार केलेला आहे. त्या राष्ट्रामध्ये किंवा देशामध्ये राजकीय पक्षपद्धती असणे ही काळ्या दगडावरची रेष आहे.

## ३.२ व्याख्या :-

राजकीय पक्षाचा अर्थ म्हणजे लोकांचा आस समूह जो संघटित झालेला आहे की, जो सार्वजनिक प्रश्नाबद्दल एक समान विचारधारा ठेवतो आणि राजकीय दृष्टिकोनातून आपल्या कार्याला व ध्येय-धोरणाला व्यापकता यावी म्हणून शासनावर नियंत्रणाच्या माध्यमातून सत्ता हस्तगत करण्याचा प्रयत्न करत असतो. राजकीय शास्त्रज्ञ किंवा विचारवंत मॅकआइव्हरच्या मते, ''राजकीय पक्ष हा एक असा संघ आहे, जो एका निश्चित विचारधारेवर आधारलेला असातो आणि त्यासाठी त्याने वैधानिक मार्ग व साधनांद्वारे सरकारच्या निश्चयतेला व्यवस्थित रूप देण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतो.''[२]

तसेच ''डॉ. लिलॉक यांनी राजकीय पक्षाची तुलना एक अशा भांडवली स्वरूपातील कंपनीबरोबर करतात की, ज्यामध्ये प्रत्येक सदस्याने आपल्या राजकीय शक्तीचा अंश दिला पाहिजे. त्यांनी असे म्हटले आहे की, प्रत्येक राजकीय पक्ष हा मानवी स्वभावाच्या दोन गुणांवर आधारित असतो. प्रथमत: त्यांनी असे म्हटले आहे की, मनुष्याच्या विचारधारेमध्ये भिन्नता असते, परंतु त्याचबरोबर त्यात काही वेळेस स्वाभाविकपणे साम्य असते. जर त्यांना समाजामध्ये रहायचे असेल तर त्यासाठी त्यांना आपल्यामधील मतभेदांचा इतरांबरोबर समन्वय करावा लागे. त्यासाठी त्यांना काही विचारधारेच्या तत्त्वावर निर्णय घ्यावा लागे. दुसऱ्या गुणाबद्दल लिलॉक सांगतात की, राजकीय पक्ष समान विचारधारा ठेवणाऱ्या लोकांमध्ये समाविष्ट होतात, जेणेकरून त्या विचारधारेला एक संघटित रूपी दृष्टिकोनावर प्रस्तुत करतात आणि अशा प्रश्नावर समर्थन प्राप्त करतात की, ते पक्षपाती वाटतात.''[३]

राजकीय पक्षांची निर्मिती करण्यासाठी आधारमूलक सिद्धांतावर आधरित असा एक पक्का किंवा मजबूत समाविष्ट उपाय असणे गरजेचे आहे की जो राजकीय दृष्टिकोनातून लोकांना एकत्र करील. व्यापकतेच्या दृष्टिकोनातून त्यांच्यामध्ये मतभेद

असू शकतील पण ज्या सिद्धांतावर ते स्थिर आहेत, त्याबद्दल कोणतेही मतभेद असू शकत नाहीत. जर एखाद्या आधारभूत सिद्धांतावर त्यांची एकवाक्यता होत नसेल तर ते एकमेकांशी सहकार्य करू शकत नाहीत आणि आपल्या राजकीय लक्षांना गाठू शकत नाहीत. तसेच स्त्री व पुरुष यांच्याबद्दल सारखा दृष्टिकोन ठेवून त्यांना योग्य तऱ्हेने एकत्रित करू बघतात. योग्य संघटनांशिवाय लोक असंघटित गर्दीचे रूप धारण करतात. त्यामुळे एक चांगल्या व समाविष्ट सिद्धांताला कृतीमध्ये आणणे अशक्य होते.

राजकीय पक्षाबद्दल बर्क व्याख्या करतात की, राजकीय पक्ष ''मनुष्याचे असे संघटन आहे की जे सिद्धांत- विशेष आधारावर त्यामध्ये सर्व सामील आहेत. सर्वांची सहमती आहे, आणि सर्वांच्या संयुक्त प्रयत्नांद्वारे राष्ट्रहितवृद्धीसाठी संघटित होतो.''[४] जेव्हा एक राजकीय पक्ष आपल्या कार्य धोरणाला एका विशिष्ट वर्गीय उद्देशंसाठी व स्वार्थी लक्ष गाठण्याच्या दिशेने कार्यप्रणव करतात, तेव्हा तो एका समूहाचे रूप धारण करतो. रूसेक हुजार या राजकीय तत्त्ववेत्त्याच्या मते, ''राजकीय पक्ष हा मुख्यत: विचारधारा व संघटन याद्वारे एकत्र दिसतात.'' कार्लस फ्रेडरिक यांच्या मतानुसार राजकीय पक्ष, ''मनुष्याचा असा समूह आहे की, जो आपल्या स्थायी संघटनरूपी लक्षाद्वारे आपल्या नेत्यांना सरकारवर नियंत्रण स्थापित करण्यासठी मदत करतो आणि त्याचे दुसरे लक्ष्य म्हणजे या नियंत्रणाद्वारे आपल्या पक्षांच्या सदस्यांना लाभ व सुविधा उपलब्ध करून देतात.'' म्हणजेच राजकीय पक्षाचे अंतिम उद्देश हे सत्ताप्राप्ती असते.

### ३.३ राजकीय पक्षाचे महत्त्व :-

''राजकीय पक्ष हे लोकशाहीवादी विचारांची कास धरून सरकार चालविण्यासाठी अपरिहार्य असतात. वास्तविकपणे ते एक अशी प्रेरक शक्तीप्रदान करतात की, ज्यामुळे प्रशासकीय यंत्रणा गतिशील होत असते.''[५] मॅकाआयव्हरच्या मते, राजकीय पक्षांशिवाय कोणत्याही सिद्धांताचे विवरण सारखे होत नाही, धोरणांचा व्यवस्थित विकास होऊ शकत नाही, सांसदीय निवडणुकांच्या वैधानिकतेचे नियमन होऊ शकत नाही. जे लोक राजकीय

पक्षांचे अस्तित्व व प्रभावाबद्दल उदासीन असतात ते लोकशाहीच्या यंत्रणेला समजू शकत नाहीत. याबद्दल ''राजकीय विचारवंत लॉवेलच्या म्हणण्यानुसार ''कोणत्याही महान राष्ट्रामध्ये जनतेद्वारे सरकार निर्माण करण्याची धारणा एक मनगढंत कल्पना असते, कारण की ज्या ठिकाणी मताधिकार विस्तारलेला असतो, त्याठिकाणी राजकीय पक्षाचे अस्तित्व निश्चित ज्यांच्या हातात असते की त्यांच्याकडे बहुमत असते. कोणत्याही राजकीय पक्षाचा उद्देश शासनावर प्रभाव टाकून स्वत: सत्ता हस्तगत करणे हा असतो आणि त्याचबरोबर निवडणूक प्रणालीला प्रभावित करून निवडणूक जिंकणे व आपल्या धोरणांना कार्यान्वित करण्यासाठी सत्ता स्थापन करणे हा असतो.''[६]

''लॉवेल या विचारवंताच्या मतानुसार, जसे समुद्रामध्ये भरती-ओहोटी निश्चित असते त्याप्रमाणे लोकशाहीसाठी राजकीय पक्ष अनिवार्य असतात. त्याचबरोबर राजकीय पक्षाचे मुख्य कार्य म्हणजे कोणत्याही प्रश्नावर जनमत तयार करणे होय आणि लोकमत तयार करण्यासाठी ते काही सिद्धांताचे प्रश्न उपस्थित करतात. एकूणच राजकीय पक्षच लोकशाही राष्ट्रांमध्ये असे साधन आहे की, ज्यांच्याद्वारे बहुमत धारण केलेले लोकप्रिय सरकार कार्यान्वित करू शकते.''[७] एका अर्थाने राजकीय पक्षच आपले धोरण व कार्यक्रम तयार करतात आणि त्या आधारे आपल्या उमेदवारांचा प्रचार करतात. अशा प्रकारे पक्षाचे सर्व सदस्य एका आवाजात बोलत असतात. माणसे निवडणुकीमध्ये सहभागी होतात, जर राजकीय पक्ष संघटित नसेल मतदाता तर आपले मत कोणत्याही विचाराशिवाय कोणलाही देऊ शकतात. म्हणजेच राजकीय पक्षांद्वारे प्रातिनिधिक सरकार ही यशस्वी होऊ शकते.

## ३.४ राजकीय पक्षाचा उगम :-

''ज्या देशात वास्तविकपणे पक्षपद्धती असेल म्हणजेच जिथे दोन किंवा दोनपेक्षा जास्त संघटित राजकीय पक्ष असतील तर त्या ठिकाणी राजकीय प्रौढता आहे असे मानले जाते. सुमारे १०० वर्षांपासून राजकीय पक्षाचा विकास होत आला आहे. त्यापूर्वी

विखुरलेले लोकमत होते, क्लब स्वरूपी घर होते. आदर्श समाज होता, सांसदीय विचार गोष्टी होत्या पण एक संघटित राजकीय पक्षाचा अभाव होता. आज जगातील अनेक देशांमध्ये संघटित राजकीय पक्ष आहेत. ज्या देशात नाही तिथे त्यांचा विकास होत आहे.

ऐतिहासिक विकासाच्या दृष्टिकोनातून''[८] राजकीय पक्षाचा विकास आधुनिक मताधिकाराचे अपत्य आहे. म्हणजे मतदान प्रणलीच्या माध्यमातूनच राजकीय पक्षाचा जन्म झाला आहे. जेव्हा जेव्हा मताधिकार व्यापक झाला, तेव्हा तेव्हा राजकीय पक्षांची नवीन संघटनांची आवश्यकता निर्माण झाली आहे. मतदात्यापर्यंत आपल्या पक्षांचे ध्येय-धोरण पोहचविणे व त्यांना आकर्षित करून जास्तीत जास्त मते घेण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. अशा प्रकारे राजकीय पक्षांना एक नवीन दर्जा प्राप्त होत असतो. ''आता राजकीय पक्षाने एक असे मोठे संघटन निर्माण केले आहे की, जनतेद्वारे त्यांना विधिमंडळात पाठविले जाते. तसेच राजकीय पक्षांनी आता आपले वेगवेगळे संघटन निर्माण केले आहे आणि निवडणुकीमध्ये पैसे जमा करण्यास सुरूवात केली आहे.''[९] म्हणजेच राजकीय पक्षाशिवाय ते आपला उद्देश निर्माण करू शकत नाहीत आणि वाद-विवाद करू शकत नाहीत. तसेच एक संघटित जनमत तयार करू शकत नाहीत. जर यापेक्षा अधिक कठीण वाक्यात म्हटले तर पक्ष उत्पत्तीद्वारे मतदात्यांना एक असे माध्यम प्राप्त झाले आहे की, ज्याद्वारे त्यांना एक उचित आणि संघटित कार्यवाही करण्यासाठी संधी प्राप्त झाली आहे.

**पक्ष उत्पत्तीचा मानवी स्वभाव सिद्धांत :-**

''पक्ष उत्पत्ती व विघटनाची मुख्य व्याख्या ही मानवी स्वभावावर आधारित आहे. या सिद्धांतानुसार काही लोक सहज मनाने रूढिवादी असतात आणि त्याद्वारे ते कोणतेही गोष्टीवर तटस्थ असतात आणि दुसरे सहज मनाने प्रगतिशील व परिवर्तनवादी असतात. या दोन स्वाभाविक मनोवैज्ञानिक पक्षाच्या विभाजनाला वामन पंथी आणि दक्षिण आफ्रिका पंथी नाव दिले गेले. या नावाची उत्पत्ती महाउपद्वितीय राष्ट्रांच्या विधिमंडळातील एक प्रचलित प्रथेच्या आधारावर झालेली आहे. जिथे प्रगतिवादी सदस्य

राष्ट्रपतीच्या उजव्या बाजूला आणि विरोधी सदस्य डाव्या बाजूला बसतात. ही प्रथा १७८९ मधील फ्रेंच राष्ट्रीय सभेपासून प्रारंभ झाली आहे.''[१०]

या स्वाभाविक स्वभावसंबंधी विभिन्नतेमध्ये काळ आणि परिस्थितीनुसार परिवर्तनाचा उगम होतो. ''लॉरेंस लॉवेल यांच्यानुसार काही माणसे स्वभावानुसार संतुष्ट किंवा असंतुष्ट असतात. तसेच आशावादी आणि निराशावादी असतात. संतुष्ट आणि आशावादी उदारवादी (liberal) असतात. असंतुष्ट परंतु आशवादी प्रगतीशील (Radical) असतात. संतुष्ट आणि निराशावादी अनुदारवादी (Conservative) असतात. असंतुष्ट आणि निराशावादी प्रतिक्रियावादी (Reactionary) असतात, लॉवेलच्या मते, ''पूर्ण विरोधी स्वभावाचे माणसे कधीही एक-दुसऱ्याच्या विचारांचा आजीवन स्वीकार करीत नाहीत कारण की, जोपर्यंत ते आपल्या स्वभावामध्ये परिवर्तन करीत नाहीत. मानवी स्वभावाचा राजकीय विचारधारेवर एका मर्यादेपर्यंत प्रभाव पडत असतो. त्यामुळे राजकीय पक्ष पद्धतीचा उगम हा मानवी स्वभाव सिद्धांताला लागू पडत असतो.''[११] स्वभावाने शांत असलेला मनुष्य सुध्दा राजकीय क्षेत्रामध्ये उग्रवादी विचार धारण करू शकतो आणि स्वभावाने उग्र असलेली व्यक्ती पण उदारमतवादी विचार ठेवू शकते. म्हणून मनुष्याच्या राजकीय चिंतनावर कुटुंब आणि समाजाची परंपरा, सामाजिक घटक, आर्थिक हित, राजकीय परिस्थिती, धार्मिक विश्वास, जातीय आणि सांप्रदायिक संघटनेचा आणि राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पर्यावरणवाद इत्यादीचा निर्णायक प्रभाव पडत असतो.

''राजकीय पक्ष पद्धतीच्या उगमाबाबत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे आर्थिक हित संघर्ष हा सुध्दा आहे. राष्ट्रीय पक्ष हा क्षणिक प्रवृत्ती किंवा अस्थायी आवश्यकतेच्या बलावर स्थिर राहत नसतो. त्यासाठी त्यांना स्थायी, कायमस्वरूपी वर्गीय हिताची जोपासना करावी लागेल. विशेष करून त्यांना आर्थिक हितांच्या दृष्टिकोनातून संघटित केली जाऊ शकते.'' साधारणपणे संपत्तीविषयक भेदभाव, त्यांचा आर्थिक दृष्टिकोन आणि त्यांची आर्थिक परिस्थिती ही मुख्यरूपी राजकीय पक्षाच्या

स्थापनेसाठी मदत करत असते. धनवान वर्ग हा परंपरावादी असतो. ते सहसा परिवर्तनाला विरोध करतात. ज्या लोकांकडे संपत्ती नसते ते स्वभावत: आशावादी असतात. म्हणजेच आर्थिक हितांचा दृष्टिकोन हा राजकीय पक्ष पद्धतीच्या उगमामध्ये महत्त्वाची भूमिका बजावीत असतो.''[१२]

कधी कधी असे म्हटले जाते की, मनुष्य हा राजकीय आणि धार्मिक संस्कार घेऊन जन्माला येतो. ज्या प्रकारे मनुष्याची एका विशिष्ट धार्मिक समाजात वावरण्यासाठी कटिबध्द असतो. त्याचबरोबर विशिष्ट सदस्यत्व हे मनुष्याच्या पर्यावरण परिस्थितीवर अवलंबून असते. त्यांच्या कुटुंबातील सदस्य आणि मित्र हे त्यांच्यासाठी राजकीय पक्षातील प्रवेशाचा मार्ग शोधत असतात. संपत्ती प्रभुत्वानुसार त्याची पक्षीयनिष्ठाही अनेक पिढीपर्यंत चालत असते. काही राजकीय पक्ष धार्मिक भावनेवर आधारित असतात. पाश्चात्य राष्ट्रांमध्ये धार्मिक व सांप्रदायिक भावनेला सरकार चालविण्यासाठी कोणतेही स्थान देत नाहीत. परंतु दुर्दैवाने भारतातील राजकीय पक्ष धार्मिक भावनेवर आधारित आहेत. आज भारत धर्मनिरपेक्ष राष्ट्र म्हणून विकास पावत आहे, परंतु अकाली दल, हिन्दू महासभा, मुस्लिम लीग या सारखे सांप्रदायिक पक्ष अस्तित्वात आहेत. सांप्रदायिक राजकीय पक्ष हे राष्ट्रीय भावनेची प्रगती आणि सांसदीय सरकारची यशस्वी कार्यप्रणालीविरुद्ध आचरण करतात. वास्तविकपणे राष्ट्रीय एकात्मतेच्या निर्मितीसाठी राजकीय धर्म निरपेक्षता आणि सामाजिक आणि आर्थिक कार्यक्रमाची अंमलबजावणी करण्याची नितांत आवश्यकता आहे.

''राजकीय पक्षांचे प्रथम कर्तव्य म्हणजे निवडणुकीपूर्व लोकमत तयार करणे होय. त्यासाठी त्यांना पक्षीय संघटनांची स्थायी व सदृढ स्वरूपाची गरज असते. जर संघटन पक्के नसेल तर धोरणे अस्पष्ट राहतील. फाईनर या विचारवंताच्या मते, ''राजकीय पक्ष हे एका राज्यातील छोट्या राज्यासारखे असतात.''[१३] म्हणजेच राज्यासारखे पक्षांचे लोक समर्थक असतात, त्यांची स्थानिक शाखा असतात, तसेच त्या शाखेच्या उपशाखासुद्धा

असतात. राजकीय पक्ष राज्यासारखेच पैसा-धन एकत्रित करतात, सदस्यांची नोंदणी करतात, पक्षीय परिषदेच्या निवडणुका घेतात, नेत्यांच्या निवडीबाबत जबाबदार असतात आणि नीती ग्रहण करतात.

## ३.५ राजकीय पक्षांचा विकास :-

"आधुनिक पक्ष पद्धतीचा सर्वप्रथम विकास युरोपमध्ये झाला. संयुक्त राज्य अमेरिकेमध्ये सुद्धा युरोपीय तंत्राचा अवलंब केला गेला पण काही बदल करवून घेण्यात आले. युरोपीय राजकीय पक्ष पद्धतीचा अभ्यास करताना त्यांनी एक चांगल्या राजकीय पक्ष पद्धतीची स्थापना केल्याचे दिसून येते. त्यांच्या पक्ष पद्धतीची रचना आज जगामध्ये जागतिक पक्ष पद्धतीमध्ये दिसून येते."[१४]

आधुनिक पक्ष पद्धतीचा उगम हा काही एका काळात झाला नसून तो टप्प्या टप्प्याने काही पक्षांचा उदय दुसऱ्या महायुद्धानंतर झालेला आहे. तर काही पक्षांचा उदय १९१९ ते १९३९ या काळात झाला आहे. (उदा. कम्युनिष्ट पार्टी किंवा फॅसिस्ट पक्ष) म्हणजेच एकोणिसाव्या शतकाच्या शेवटी काही पक्ष उदयास आले तर काही एकोणिसाव्या शतकाच्या मध्यात उदयास आले. युरोपातील पक्ष पद्धतीचा विकास हा टप्प्याटप्प्याने होत गेला. या पक्ष पद्धतीमध्ये दोन विचारधारेचा संघर्ष आपणास पाहावयास मिळतो, ती म्हणजे अनुदारवादी (Conservative) आणि उदारमतवादी (Liberal) अनुदारवादी हे भांडवलशाहीचे समर्थक तर उदारमतवादी समाजवादी विचारसरणीचे समर्थ आहेत. या दोन विचारधारेचा संघर्ष हा पक्षपद्धतीच्या विकासाच्या दृष्टिकोनातून महत्त्वाचे ठरतात.

"१९ व्या शतकाच्या मध्यकालावधीमध्ये युरोपियन राजकीय जीवन अनुदारवादी व उदारमतवादी संघर्षाच्या विचारधारेखाली वावरत होते. या संघर्षाची सुरूवात १७८९ फ्रेंच क्रांतीपासून झाली. यानंतर १८४८ मध्ये दुसरा संघर्ष दिसून येतो. तो म्हणजे भांडवलशाही आणि समाजवाद विचारधारेचा या मधूनच वर्गसंघर्ष आणि वैचारिक संघर्ष

हा दिसून येतो. या संघर्षांतून पक्ष पद्धती निर्माण झाल्याचे स्पष्ट होते.''[१५] पक्ष प्रणाली ही एक अत्यंत महत्त्वपूर्ण संस्था आहे. प्रत्येक लोकशाही पुरस्कृत राष्ट्रामध्ये एक वैधानिकतेचे रूप धारण केलेले विधान आहे. परंतु जर ती कोणत्याही राज्याच्या वैधानिक रचनेतून बाहेर असेल आणि कोणत्याही देशाच्या संविधानामध्ये तिचा उल्लेख नसेल तर ती फक्त एक वस्तुसदृश्य असेल. संयुक्त राज्य अमेरिकेच्या राज्यघटनेमध्ये राजकीय पक्षांची कल्पना दिसून येत नाही. यामागाचे कारण असे की, घटनेच्या निर्माणकर्त्यांनी या सामान्य मताशी एकरूप होते की, राजकीय पक्षाचे राज्यघटनेमधील उल्लेख हा राष्ट्रीय एकात्मतेला तडा जाण्यासारखी कल्पना आहे. तसेच त्याद्वारे संघर्ष, वादविवाद, विग्रह, व्यक्ती छळ-कपट या गोष्टीला प्रोत्साहन होईल. परंतु संयुक्त राज्य अमेरिकेत काही वर्षांनंतर पक्षीय विभिन्नता आणि पक्षीय भावना दिसून आली. १७९६ च्या राष्ट्रपती निवडणुकीत दोन राष्ट्रीय पक्षांचे अस्तित्व दिसून आले. एक पक्ष जॉन ॲडम्स यांचा होता तर दुसरा पक्ष थॉमस जेफरसन यांच्या नेतृत्वाचा होता. इ.स. १८०० पर्यंत सरकारमध्ये राजकीय पक्षांचे अस्तित्व चांगल्या प्रकारे दिसून आले. अमेरिकेच्या १२ व्या घटना दुरुस्तीची आवश्यकता यासाठी निर्माण झाली की, प्रमुख निर्वाचन गणाद्वारे निवडणूक वैधानिकरीत्या व्यवस्थित झाली पाहिजे. तेव्हापासून अमेरिकेतील राजकीय जीवनामध्ये राजकीय पक्षांचे महत्त्व वाढत गेले.

''प्रा. ब्रोगन यांच्या मते, ''राष्ट्रीय पक्ष पद्धतीच्या अभावामुळे राष्ट्रपतीची निवड म्हणजे आपल्या कर्तव्याचे पालन करण्यासाठी एक राष्ट्रीय व्यक्तीच्या रूपात अशक्य होते आणि यामध्ये सत्यता अशी आहे की, हीच अमेरिकेतील संवैधानिक पद्धतीची असफलता जी गृहयुद्धापासून सुरू झाली.'' गिलख्रिस्ट या विचारवंताच्या मते, ''पक्ष पद्धती ही अमेरिकेतील वास्तविकतेचा मार्ग होता की ज्याने संवैधानिक कार्यप्रणालीला वाव दिला.'' म्हणजे पक्ष पद्धती ही अमेरिकेतील संविधान निर्मात्यांनी जी स्वीकारली नाही तीच पक्षपद्धती आज अमेरिकेतील विकासास एक रूप देत आहे.''[१६]

पक्ष पद्धतीचा आरंभसुद्धा ज्या देशाने लोकशाही विचारधारेला जन्म दिला म्हणजे ब्रिटनमध्येसुद्धा पूर्वीपासून अस्तित्वात होती. पंरतु आज या देशाच्या कायद्याने राजकीय पक्षाला मान्यता दिली नाही. पण राजकीय पक्षांच्या अभावामुळे ब्रिटिश संविधानामध्ये बदल होण्याची शक्यता आहे. म्हणजेच आज अनेक लोकशाहीवादी देशांमध्ये पक्ष पद्धतीचा विकास झाल्याचे दिसून येते. पण राजकीय पक्षांना तेथील राज्यघटनेने किंवा कायद्याने मान्यता दिलेली नाही हे महत्त्वपूर्ण विधान आपणास समजून येईल. लोकशाहीमध्ये आलोचनात्मक सरकारी कामकाज चालत असते आणि यामध्ये विचार-मतभेद या सर्व गोष्टींचा समावेश असतो. हुकूमशाही स्वरूप विचार-मतभेद या गोष्टी सहन करत नाहीत. यावरून निष्कर्ष असा निघतो की, शुद्ध राजकीय पक्षांशिवाय लोकशाहीचे भविष्य प्रखर नसते.

''राजकीय पक्ष पद्धतीचा उगम व विकास हा पाश्चमात्य देशांमध्ये झालेला आपणास दिसून येतो. यामध्ये प्रामुख्याने आपल्याला उदारमतवादी (Libreals) आणि अनुदारवादी (Consevatives) या दोन विचारधारेचा संघर्ष दिसून येतो. इंग्लंड या देशाने लोकशाही  विचारधारेची कास धरून पक्ष पद्धती सर्वप्रथम रूजवली हे यातून स्पष्ट होते. आंतरपक्ष पद्धतीची सुरूवात वरील दोन संघर्षामधून झाली आहे असे दिसून येते. आज अनेक देशांमध्ये लोकशाही शासन आहे आणि ज्या देशामध्ये लोकशाही असते तेथे राजकीय पक्षांचे अस्तित्व अनिवार्य असते. म्हणजे लोकशाहीचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून राजकीय पक्ष हे फार महत्त्वाचे ठरतात. पक्ष पद्धतीचे अनेक प्रकार आहेत. यामध्ये एक पक्ष पद्धती, द्विपक्ष पद्धती तसेच अनेक पक्ष पद्धती असे पक्ष पद्धतीचे प्रकार आहेत.''[१७] वेगवेगळ्या देशांमध्ये तेथील जनतेने लोकशाहीच्या दृष्टिकोनातून पक्ष पद्धतीचे वेगवेगळे रूप धारण केलेले आहे असे दिसून येते.

आज भारत देशामध्येसुद्धा पक्ष पद्धतीचा विकास झालेला आहे. भारत देशामध्ये पक्ष पद्धतीचा उगम ही ब्रिटिशांची देणगी आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

भारतावर सुमारे १५० वर्षे इंग्रजांचे राज्य होते. ‘‘स्वातंत्र्य चळवळीच्या माध्यमातून १८८५ मध्ये स्थापन झालेली राष्ट्रीय सभानामक संघटना (काँग्रेस) हीच पुढे एका मोठ्या पक्षाचे रूप धारण करून अनेक वर्षे सत्ताधारी पक्ष म्हणून परिचित आहे. भारतामध्ये वास्तविकपणे प्रथमतः १९२५ मध्ये कम्युनिस्ट पक्षाची स्थापना श्री. एम.एन. रॉय यांनी केली. तेव्हापासून स्वातंत्र्य चळवळीच्या माध्यमातून विविध संघटनांचा उदय होऊन त्यांचे रूपांतर आज अनेक पक्ष पद्धतीचा उदय झाल्याचे आपणास दिसून येतो.’’[१८]

‘‘भारत देश हा १५ ऑगस्ट १९४७ ला स्वतंत्र झाला. १९५१-५२ मध्ये निवडणुका पार पडल्या. श्री. पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या अधिपत्याखाली पहिले काँग्रेसी सरकार सत्तेवर आले. १९५१ मध्ये जनसंघ पक्षाची स्थापना डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी केली. जनसंघ म्हणजेच आजचा राष्ट्रीय पक्ष भारतीय जनता पार्टी हा पक्ष होय. १९५१ ते १९७६ पर्यंत काँग्रेस पक्षाचे निर्विवाद वर्चस्व सरकारमध्ये असल्याचे दिसून येते. यानंतर १९७७ मध्ये जनता पक्षाचे मोठे अस्तित्व दिसून येते. म्हणजे सत्तेमधील फेरबदल हा सुद्धा जनतेचा पक्षीय कल असल्याचे आपणास दिसून येते. आज भारत देश जगातील सर्वात मोठा लोकशाही राष्ट्र आहे. लोकसंख्येच्या दृष्टिकोनातून आज भारताचा दुसरा क्रमांक लागतो. भारतीय पक्ष पद्धती ही बहुपक्ष पद्धती आहे.’’[१९] याचबरोबर या पक्ष पद्धतीबद्दल अनेक आक्षेप घेतले जातात. भारतीय पक्ष पद्धतीचा उगम व विकास आपण खालीलप्रमाणे बघणार आहोत.

### ३.६ भारतीय पक्ष पद्धती उगम व विकास :-

‘‘भारत हे एक लोकशाही समृद्ध राष्ट्र आहे. म्हणजेच सर्वच लोकशाही समर्थक देशाप्रमाणे भारतातसुद्धा राजकीय पक्षांचे अस्तित्व आहे. भारत देश हा विविध जाती-धर्माचा देश असून यामध्ये विविध राजकीय पक्षांचे अस्तित्व हे बहुपक्ष पद्धती म्हणून ओळखले जाते. भारताच्या स्वातंत्र्याच्या काळापासून आजपर्यंत लोकशाही व्यवस्थेमध्ये

राजकीय पक्षांचे कार्य अत्यंत महत्त्वपूर्ण राहिलेले आहे. या दृष्टिकोनातून भारतीय जनता आपले हित जोपासण्याच्या दृष्टीने प्रत्येक राजकीय पक्षांना समकक्ष ठेवण्याचे काम करते.''[२०]

भारतीय राजकीय पक्ष पद्धतीचा अभ्यास केला तर आपणास असे समजून येते की, भारताने इंग्लंड व अमेरिकेप्रमाणे द्विपक्ष पद्धतीचा स्वीकार केला नसून बहुपक्ष पद्धती हे भारताचे वैशिष्ट्य आहे. राष्ट्रीय स्तरावर आणि राज्य स्तरावर भारतात राजकीय पक्षांचे अस्तित्व दिसून येते. वास्तविकपणे भारतातील पक्ष पद्धती ही बहुपक्ष पद्धती असली तरी काही काळापर्यंत ती एकपक्ष पद्धती (काँग्रेस पक्षाची सत्ता) राहिलेली आहे. सैद्धांतिक दृष्टिकोनातून बहुपक्ष पद्धती ही लोकशाहीसाठी घातक असते, परंतु भारतात अनेक पक्ष असूनसुद्धा काँग्रेस पक्षाचे अस्तित्व आपणास दिसून येते. इ.स. १९६७ ते १९७० या कालावधीव्यतिरिक्त भारतीय राजकीय व्यवस्थेची हीच परिस्थिती राहिलेली आहे की, कोणताही राजकीय पक्ष हा आपल्या स्वत:च्या बळावर स्वत:ची सरकार स्थापन करू शकेल. १९६७ पूर्वी भारतीय राजकीय व्यवस्थेमध्ये काँग्रेस पक्षाचे अधिपत्य आहे. भारतीय पक्षीय व्यवस्था ही नेत्यांच्या चमत्कारिक व्यक्तित्वावर आधारित असल्याचे आपणास दिसते. यामध्ये एक प्रबळ विरोधी पक्षांचा अभाव आपणास दिसून येतो.

**काँग्रेस पक्ष :-**

''काँग्रेस पक्षाची स्थापना १९३५ मध्ये ब्रिटिश अधिकारी ए.ओ. ह्यूम यांनी केली होती. १९०७ पर्यंत काँग्रेसचे उद्दिष्ट विदेशी शासनावर दबाब टाकणे हा होता. पण १९०७ ते १९१९ पर्यंत काँग्रेस पक्ष उदारमतवादी व उग्रवादी विचारधारेने ग्रासला होता. यानंतर १९२० ते १९४७ पर्यंत काँग्रेस पक्षाचे नेतृत्व महात्मा गांधी यांनी केले होते. स्वातंत्र्य मिळाल्यानंतर काँग्रेस ही एक संघटना एका पक्षाच्या स्वरूपात परिवर्तीत झाली. इ.स. १९६७ मध्ये या पक्षाची स्थिती डबघाईस आली होती. पण १९७५ मध्ये 'इंदिरा काँग्रेस'च्या स्थापनेनंतर लोकशाही, धर्मनिरपेक्षता आणि समाजवाद या तीन

तत्त्वांवर काँग्रेस पक्ष पुन्हा प्रबळ झाला.''[२१] मधला काही कालखंड भारतीय जनता पक्ष पुरस्कृत राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA) सरकारच्या सत्तेचा कालखंड वगळता २००३ पासून काँग्रेसप्रणीत राष्ट्रीय पुरोगामी आघाडी (UPA) ही सरकार सत्ताधारी म्हणून कार्यरत आहे.

**भारतीय जनता पक्ष :-**

''आधुनिक काळातील भारतीय जनता पक्षाची स्थापना १९८० च्या निवडणुकीपूर्वी १९५१ मध्ये श्यामाप्रसाद मुखर्जी यांनी केली. १८ जानेवारी १९७७ मध्ये सहाव्या लोकसभेच्या निवडणुकीच्या घोषणेनंतर 'भारतीय जनसंघ' हा 'जनता पक्षात' विलीन झाला. यानंतर १९८० च्या निवडणुकीत भारतीय जनता पक्षांचा पराभव झाला व जनसंघ परिवारातील लोकांनी या पार्टीसोबत आपले नाते मोडून ६ एप्रिल १९८० रोजी नवी दिल्लीच्या एका संमेलनामध्ये 'भारतीय जनता पक्ष' नावाने पक्षाची स्थापना केली.''[२२] या पक्षाचे पहिले अध्यक्ष म्हणून अटलबिहारी वाजपेयी यांची निवड करण्यात आली. गांधीवादी व्यवस्थेवर विश्वास ठेवणारा पक्ष म्हणून कार्य करणे हे त्यांनी आपल्या पक्षाची ध्येय-धोरणे निश्चित केले. तसेच भारतीय जनता पक्ष हा जयप्रकाश नारायणांनी केलेल्या आंदोलनावर विश्वास व त्यांच्या उद्देशांवर चालणाऱ्या प्रेरणा घेऊन कार्य करीत हे एक तत्त्व त्यांनी मान्य केले. राष्ट्रवाद आणि राष्ट्रीय समन्वय, सैद्धांतिक पद्धतीवर आधारित राजकारण, गांधीवादी समाजवाद, लोकशाही व धर्मनिरपेक्षता या तत्त्वाचा स्वीकार करून हा पक्ष कार्य करेल. ही या पक्षाची विचारसरणी ठरवली गेली.

१९८० पासून भारतीय जनता पक्ष हा १९९९ ते २००३ चा कालखंड वगळता या कालखंडात केंद्रात सत्ता संपादन करून राष्ट्रीय सरकार चालविण्याचा प्रयत्न केला. यानंतर एक प्रबळ विरोधी पक्ष म्हणून हा पक्ष आज भूमिका बजावत आहे.

**जनता दल :-**

"जनता दल या पक्षाचा उदय काँग्रेस पक्षातील मतभेदांची झालेली परिणीती हे महत्त्वाचे तथ्य आहे. इंदिरा गांधी आणि राजीव गांधी यांच्या व्यक्तिमत्त्वाची लोकप्रियता १९८७-८८ मध्ये कमी झाल्यामुळे विरोधी पक्ष हे विघटित होते. लोकांना काँग्रेस पक्षाशिवाय पर्याय उरला नाही. परंतु नंतर विरोधी पक्षांतील लोकांनी नवीन विचारसरणीचा आधार घेऊन एक प्रबळ राजकीय पक्ष स्थापन करण्याची आवश्यकता आहे, असा निर्णय घेऊन विघटित विरोधी पक्षांनी एक संयुक्त पक्षाची निर्मिती केली त्याचाच परिणाम म्हणजे जनता दल आणि राष्ट्रीय मोर्चा हे पक्ष होय."[२३] या पक्षाचे अध्यक्ष म्हणून विश्वनाथ प्रताप सिंग यांची निवड करण्यात आली. तसेच त्यांच्या व्यक्तिमत्त्वाला भावी पंतप्रधान म्हणून पाहिले गेले. जनता दल या पक्षाने सामान्य जनतेसमोर आपले पक्षाच्या ध्येय-धोरणाचा खुलासा केला. यामध्ये नागरिकांना मूलभूत अधिकार देणे, काम करण्याच्या अधिकाराला मूलभूत अधिकार म्हणून मान्यता देणे, आकाशवाणी व दूरदर्शन केंद्रांना स्वायतत्ता प्रदान करणे, पंचायत राज व्यवस्थेचे नियमित निवडणुका घेणे. निवडणूक सुधारणा करणे, याचबरोबर मंडल आयोगाची निर्मिती व शिफाराशी मान्यता यासारखी अनेक कार्ये जनता दल या पक्षाच्या शासन काळामध्ये झाले.

**भारतीय साम्यवादी पक्ष (C.P.I.)-**

"श्री. मानवेंद्रनाथ रॉय यांच्या प्रेरणेमुळे २६ डिसेंबर १९२५ रोजी भारतात साम्यवादी पक्षाची स्थापना झाली. एम.एन. रॉय यांच्या मार्गदशनानुसार साम्यवादी पक्ष कम्युनिस्ट इंटरनॅशनल यांची शाखा मानल्या गेली आणि इ.स. १९२८ मध्ये कम्युनिस्ट इंटरनॅशनल या संघटनेने भारतात कम्युनिस्ट पक्षाची कार्यप्रणाली निश्चित केली. या पक्षाच्या संस्थापक नेत्यांमध्ये श्रीपाद अमृत डांगे, भूपेश गुप्ता, जे.ए. अहमद आणि सी राजेश्वर राव यांचे नाव घेतले जाते. भारतातील साम्यवादी पक्षाची कार्यप्रणाली

मार्क्सवाद आणि लेनिनवादी यांच्या विचारधारेशी प्रेरित होऊन आखल्या गेली.''[२४] यामध्ये पारंपरिक सामाजिक आणि आर्थिक व्यवस्थेच्या जागी एक नवीन समाजरचना निर्माण करण्याचे ध्येय होते. हा समाज दुर्बळ वर्गाचे प्रबोधन, जमीनदारी प्रथेचे उन्मूलन, संपत्तीवरील भांडवलशाहीचा एकाधिकार नष्ट करणे, सर्व नागरिकांना रोजगारांची योग्य संधी निर्माण करणे इत्यादी कार्यक्रमांवर त्यांची धोरणे निश्चित झाली होती. आजही दक्षिणेकडील काही राज्यांत कम्युनिस्ट पक्षाचे अस्तित्व आपणास दिसून येते.

**भारतीय साम्यवादी पक्ष (मार्क्सवादी) C.P.I. (M) :-**

''इ.स. १९६४ मध्ये साम्यवादी पक्षाचे विभाजन दोन भागांमध्ये होऊन एका नवीन साम्यवादी पक्षाचा (मार्क्सवादी) उदय झाला. या पक्षांनी देशांत समाजवाद आणि साम्यवादची स्थापना करण्यासाठी भारतातील कामगारांचे प्रभावी संघटन तयार केले. मार्क्सवाद व लेनिनवादाला पण मध्यवर्ती स्थान दिले. मार्क्सवादी साम्यवादी पक्ष, दक्षिण उग्र डाव्या विचारसरणीचा पक्ष आहे. यांच्या संस्थापक नेत्यांमध्ये प्रमोद दास गुप्ता, ज्योती बसू, ई.एम.एस., नंबुद्रिपाद, हरकिशन सिंह सुरजित, ए.के. गोपालन, पी. राममुर्ती इत्यादी नावांचा उल्लेख केला जातो. पक्षाच्या घोषणापत्राचे मुख्य ध्येय म्हणजे पक्ष विदेशी भांडवलाचे राष्ट्रीयीकरण करेल आणि भारतात व्यापारी दृष्टिकोनातून बहुउद्देशीय व्यापार संस्थांना प्रतिबंध लावील. परकीय कर्जाच्या देण्या-घेण्यावर मर्यादा लावील.''[२५] यावरून असे समजते की, भारतात सध्या साम्यवादी पक्षाचे विभाजन दोन भागात होऊन ते पक्ष आप-आपल्या पद्धतीने लोकशाही शासन प्रणाली आणू इच्छितात.

**बहुजन समाज पक्ष :-**

''१४ एप्रिल १९८४ रोजी कांशीराम यांनी 'बहुजन समाज पक्षाची' स्थापना केली. या पक्षाचे वैशिष्ट्य म्हणजे या पक्षाची स्वत:ची घटना नाही. न कोणतेही औपचारिक संघटन आहे. तरी पण यांचे ध्येय धोरण व कार्यक्रम म्हणजे ब्राह्मणवादाला विरोध करणे, अनुसूचित जाती व जमातीचे कल्याण इ. या पक्षाचे अस्तित्व उत्तर प्रदेश,

महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि पंजाब या राज्यांत दिसून येत आहे. सध्या मायावती या पक्षाच्या अध्यक्षा असून अलीकडील 'सोशल इंजिनिइरिंग' या संकल्पनेची अंमलबजावणी करून उत्तर प्रदेश राज्याची सत्ता हाती या पक्षाने घेतली होती.''[२६]

भारतातील पक्ष पद्धतीचा उदय व विकास हा लोकांच्या स्वभावातील राजकीय निर्णयानुसार झाला आहे, असे आपणास दिसून येते. सुरवातीस काँग्रेस हा प्रभावी पक्ष म्हणून अनेक वर्ष सत्ता गाजवित होता. अलीकडच्या काळात अनेक पक्षांची निर्मिती होऊन राष्ट्रीय पक्षापेक्षा प्रादेशिक पक्षांचे अस्तित्व वाढत आहे. त्यांना महत्त्व प्राप्त झाले आहे. १९९० सालानंतर भारतात एक प्रबळ पक्ष केंद्रस्थानी राहिला नसून सरकार चालविण्यासाठी इतर पक्षांची मदत घेतली जाते. त्यामुळे त्रिशंकू सरकारची अवस्था आपणास भारतीय लोकशाहीमध्ये दिसून येते. बहुपक्ष पद्धती ही संकल्पना लोकशाहीस घातक असते. या राष्ट्रीय एकात्मता फार टिकून राहत नाही हे आपणास दिसून येते.

### ३.७ राजकीय पक्ष पद्धतींचे प्रकार :-

राजकीय पक्ष लोकशाहीचे आधारस्तंभ आहेत. यांना जर ''लोकशाहीचे प्राण'' असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. राजकीय पक्ष हे शासकीय व्यवस्थेचे अभिन्न अंग असतात. त्यामुळे त्यांना ''सरकारचे चौथे अंग'' असे म्हटले जाते. निवडणुकीत जेव्हा राजकीय पक्ष भाग घेतात तेव्हा एकाच पक्षावर सरकार चालविण्याची जबाबदारी असते. त्यांना जनता बहुमतानी निवडून देते.

''राजकीय पक्ष एक असे साधन आहे की, ज्याद्वारे जनता आपल्या शासकीय वर्गावर नियंत्रण ठेवते. जर कोणी शासक आपल्या कर्तव्याचे पालन करीत नसल्यास जनता आपल्या मतदात्याच्या स्वरूपात दुसऱ्या पक्षाला शासन बनविण्याचा अधिकार प्रदान करते.

**लास्की** या विचारवंताच्या मते, ''राजकीय पक्ष देशाच्या एकाधिकार किंवा हुकूमशाहीपासून आपले रक्षण करतात.'' साधारणपणे राजकीय पक्ष पद्धतीचे तीन भाग

पडतात. यामध्ये १) एक पक्षीय पद्धत, २) द्विपक्षीय पद्धत आणि ३) बहुपक्षीय पद्धत अशा पद्धतीने राजकीय पक्षाच्या पद्धतीचे वर्गीकरण केले जाते, ते आपण खालीलप्रमाणे बघणार आहोत.

**अ) एक पक्ष पद्धती :-**

''ज्या राष्ट्रामध्ये एकाच पक्षाचे वर्चस्व असते आणि शासकीय सत्तासुद्धा त्यांच्याच सदस्यांच्या हाती असते तेथील पक्ष पद्धती ही एक पक्षीय पद्धती आहे असे समजले जाते. त्यांना आपण हुकूमशाही किंवा साम्यवादीसुद्धा म्हणू शकतो. अशा प्रकारची पक्ष पद्धती आपणास नाजी, जर्मनी, स्पेन, रशिया, चीन इत्यादी देशांमध्ये पाहावयास मिळते. ही जी पक्ष पद्धती असते ती लोकशाहीसाठी घातक आहे असे समजले जाते.''[२८]

त्यामुळे व्यक्तीच्या विकासाला बाधा निर्माण होण्याची शक्य निर्माण होऊ शकते. अशा प्रकारच्या पक्ष पद्धतीमध्ये व्यक्तींना काहीच अधिकार नसतात. स्वातंत्र्यसुद्धा कमीच असते. त्यामुळे राष्ट्राच्या विविध पक्षांची प्रगती होत नाही. अशा प्रकारच्या पक्ष पद्धतीमध्ये काही गुण जरी असते तरी त्यांचे अवगुण आपणास जास्त प्रमाणात दिसून येतात.

**ब) द्विपक्ष पद्धती :-**

''द्विपक्ष पद्धतीमध्ये फक्त दोन पक्षांचे अस्तित्व किंवा प्रभाव आपणास दिसून येतो. परंतु यांच्याशिवाय काही छोट्या-लहान पक्षांचेसुद्धा अस्तित्व देशात असते, परंतु त्यांची देशाच्या राजकारणात महत्त्वपूर्ण भूमिका नसते. उदा. संयुक्त राज्य अमेरिका, ब्रिटन आणि ऑस्ट्रेलिया या देशांमध्ये आपणास द्विपक्ष पद्धतीचे अस्तित्व दिसून येते. वास्तविकतेमध्ये प्रातिनिधिक सरकार चालविण्यासाठी द्विपक्ष पद्धती उपयुक्त असते की, ज्यामुळे एक पक्ष सत्ताधारी व दुसरा पक्ष प्रबळ विरोधी असतो. दोनच पक्ष प्रबळ

असल्यामुळे एकमेकांवर नियंत्रण ठेवून शासनाची कार्यप्रणाली समाजाभिमुख चालविण्याचे कार्य करीत असतात.''[२९]

**क) बहुपक्ष पद्धती :-**

''ज्या देशामध्ये अनेक राजकीय पक्षांचे अस्तित्व असते त्या देशातील राजकीय पक्ष पद्धती ही बहुपक्षीय पद्धती असते. यामध्ये कोणत्याही एका किंवा दोन राजकीय पक्षांची प्रधानता दिसून येत नाही तर सर्वच पक्ष समकक्ष प्रभाव निर्माण करत असतात. कोणत्याही पक्षाला विधिमंडळात स्पष्ट बहुमत नसते की, तो स्वत: सरकार बनवू शकेल तर त्यांना इतर पक्षांच्या साहाय्याने त्रिशंकू सरकार बनवावे लागते. बहुपक्ष पद्धती युरोपमधील राष्ट्रांत उदा. फ्रान्स, इटली इत्यादी देशांत पाहावयास मिळते. भारतातसुद्धा बहुपक्ष पद्धतीचे अस्तित्व आपल्याला दिसून येते. केंद्रस्थानी आपल्याला आघाड्याची सरकार दिसून येते. अशा प्रकारच्या पक्षपद्धतीमध्ये वेगवेगळ्या वर्गांना आणि स्वार्थी प्रवृत्तींना शासनात पूर्ण प्रतिनिधित्व प्राप्त होत असते. अशी पक्ष पद्धती लोकशाहीच्या विकासास मारक असते.''[३०]

वरील तीन पक्ष पद्धतींच्या वर्गीकरणाच्या दृष्टिकोनातून आपल्याला असे दिसून येते की, या तिन्ही पक्ष पद्धतींचे आपापले गुण-दोष आहेत. यावरून कोणत्याही व्यवस्थेला नुकसानकारक किंवा लाभदायक मानून चालू ठेवणेच योग्य आहे. ज्या ठिकाणी एक पक्षीय शासन हे निरंकुशतेला जन्म देते तर दुसरीकडे बहुपक्षीय पद्धत ही अस्थिर शासन निर्माण करते. दोन्ही व्यवस्थेमध्ये स्वार्थी तत्त्वे जास्त दिसून येतात. दोन्ही प्रकारच्या पक्ष पद्धती मतदारांच्या ध्येय-उद्देशांपर्यंत पोहचू शकत नाहीत. त्यामुळे याऐवजी द्विपक्ष पद्धती ही लोकशाहीच्या दृष्टिकोनातून जास्त उपयुक्त आहे असे दिसून येते.

प्रस्तुत प्रकरणात राजकीय पक्ष पद्धतींचा उगम व विकास याचे स्पष्टीकरण करण्यात आले आहे. या उद्देशाने जगातील पक्ष पद्धतीचा उदय व विकासाचा संदर्भ

घेऊन भारतीय पक्ष पद्धतीचासुद्धा उदय व विकासाचा संदर्भ घेण्यात आला आहे. त्याचबरोबर राजकीय पक्ष पद्धतीचे प्रकार कोणत्या पद्धतीचे आहेत याचेसुद्धा स्पष्टीकरण करण्यात आले आहे. राजकीय पक्ष पद्धती ही लोकशाहीचे एक आधारभूत अंग आहे. या पक्ष पद्धतीशिवाय लोकशाहीचा विकास होऊ शकत नाही. राष्ट्रीय एकात्मतेच्या दृष्टिकोनातून एक स्थिर सरकार चालविण्यासाठी राजकीय पक्ष मोठी भूमिका बजावत असतो. भारतीय पक्ष पद्धती ही बहुपक्षीय पद्धती आहे. या पक्ष पद्धतीला जाती-धर्माच्या भावनिकतेचा आधार आहे. त्यामुळे एक प्रखर राष्ट्रवादी पक्षाचे धोरण अवलंबिणे एक काळाची गरज आहे. आजची परिस्थिती ही स्थिर सरकार बनविण्याची आहे, पण प्रादेशिक पक्षांचा वाढता प्रभाव यामुळे प्रबळ राष्ट्रीय पक्षांना धक्का बसत आहे. लोकशाही गतिमान व स्थिर ठेवण्यासाठी द्विपक्ष पद्धती योग्य असते असे म्हटले जाते.

## संदर्भ :-


1) Thomas Pantham : Political Parties and Democratic : Consensus Publication, 1976, Macmillan Company, Meerut, P. 23.

2) Ibid, P. 24.

3) Mavrice Duverger : Party Politics and Pressure Groups, Thomas Y. Crowell Comayninc Publication, 1972, U.S.A., P. 38.

4) Ibid, P.N. 39.

5) Shiva Chandra Jha : Indian Party Politics Deep & Deep Publication, New Delhi, 1989, P. 12.

6) Ibid, P. 14

7) Ibid, P. 16

8) William H. Riker : The Theory of Political Coalitions, Oxford & IBH Publication, New Delhi, 1962, P. 22.

9) Op. cit., P. 23

10) Op. cit., P. 23

11) Mavrice Duverger : Party Politics and Pressure Groups, Thomas Y. Crowell Comayninc Publication, 1972, U.S.A., P. 58.

12) Op. cit., P. 59

13) Roy F. Nichols : The Invention of the American Political Parties Scientific Book Agency Publication, Calcutta, P. 32.

14) Ibid, P. 34

15) Ibid, P. 35

16) Frank O'Gorman : The Rise of Party in England Landon George Alien 8 Unwin Ltd., Publication, 1975, London, P. 28.

17) Op. cit., P. 30.

18) Anup Chand Kapoor : Theory of Political Science, Publication S. Chand Company, Let., New Delhi, P. 404.

19) Ibid, P. 405

20) Ibid, P. 406

21) P.G. Das : Modern Political Theory, New Central Book Agency Publisher, 1996, Calcutta, P. 44.

22) Op. cit., P. 45.

23) Op. cit., P. 46.

24) J.A. Naik : The Opposition in India and the Future of Democracy, S. Chand & Company Ltd., Calcutta, P. 37.

25) Ibid, P. 38

26) Ibid, P. 38

27) Anup Chand Kapoor : Theory of Political Science, Publication S. Chand Company, Let., New Delhi, P. 68.

28) Ibid, P. 69

29) Ibid, P. 70

30) Ibid, P. 71